# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २६.०९.२०२४

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २५/०९/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३४,८५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. २५/०९/२०२४ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ९,३९०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द जुगार कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या वाळुची चोरी करणाऱ्या विरुध कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या वाळुची चोरी करण्याऱ्या विरुध दि. २५/०९/२०२४ रोजी एकुण ०१ ठिकाण ३०३(२) भा.न्या.स सहकलम ४८(७)(८) गौण खनिज अधिनीयम प्रमाणे पोस्टे. आ.बाळापुर जि हिंगोली मौजे माळधावंडा गावामध्ये दक्षिणेस १५किमी बिट क्र ०३ मिळाला माल :— ३०,००० अंदाजे सहा ब्रास वाळु किअं २)२०,००,००० एक पांढ—या रंगाचे कॅबीन असलेले टाटा कंपनीचे टिप्पर ज्याचेवर आरटीओ पासिंग क्र एमएच २६ सीएच ७२७२ असा क्रमांक जु.वा किअं २०,३०,००० रू चा मुदेमाल नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी क्र ०१ हा आरोपी क्र ०२ यांचे सांगणेवरून मौजे माळधावंडा येथे विनापरवाना बेकायदेशिर रित्या वाळुची चोरटी वाहतुक करत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा

**सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ (COPTA 2003) अंतर्गत विक्रत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्य दि. २५/०९/२०२४ रोजी सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ अन्वये हिंगोली जिल्हा येथे एकुण १२ ठिकाणी कलम ६,२४ अन्वये गुन्हे दाखल झाला असुन एकुण मिळालेला माल १४,१९७/— रू यातील आरोपीने स्वत:चे फायदयाकरीता चालविलेल्या पानटपरी मध्ये महाराष्ट्र शासनाने विशिष्ट क्षेत्रातमध्ये प्रतिबंधीत केलेला तंबाखु जन्य वस्तु व सिगारेट/बिडी जन्य पदार्थ साठवुन वितरीत करत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा.